विपणन और प्रचार विभाग
प्रधान कार्यालय
media@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

# बँक ऑफ महाराष्ट्राच्या ग्राहकांसाठी 'रोख परतावा योजना'

**पुणे**, **1**7 **फेब्रुवारी 2020:** नवे डेबिट कार्ड घेणाऱ्यांच्यासह इंटरनेट बँकिंग आणि मोबाइल बँकिंगसाठी दिनांक 15 फेब्रुवारी ते 15 मार्च 2020 दरम्यान नोंदणी करणाऱ्या महाबँकेच्या ग्राहकांसाठी 'महाबँकरोख परतावा योजना' अर्थात कॅशबॅक स्कीमचा प्रारंभ करण्यात आला आहे.

आजच्या मोबाइल आणि इंटरनेटच्या वेगवान युगात डिजिटल व्यवहार हे अत्यंत सुरक्षित आणि सोईचे मानले जातात. डेबिट कार्ड हे डिजिटल व्यवहारांमध्ये अत्यंत महत्वाचा आधारस्तंभ असून या कार्डची माहिती मोबाइल बँकिंग, इंटरनेट बँकिंग आणि यूपीआय नोंदणीसाठी अत्यंत मूलभूत आहेत. त्यामुळे डिजिटल व्यवहारांबाबत ग्राहकांचा अधिक कल निर्माण होण्यासाठी या कॅश बॅक योजनेचा प्रारंभ बँक ऑफ महाराष्ट्रने केला आहे.

या योजनेमध्ये योजना कालावधी दरम्यान किमान एका 1000/- रुपयांच्या खरेदीसाठी विक्रेत्याकडे अथवा संगणकीय ऑनलाईन पद्धतीद्वारे महाबँक डेबिट कार्ड वापरल्यास त्या ग्राहकाला त्याच्या कार्डाच्या खात्याला रुपये 100 कॅशबॅकचा परतावा दिला जाईल. याबरोबरच जर योजना कालावधी काळात ग्राहकांनी मोबाइल बँकिंगचा प्रारंभ करून (ॲक्टिवेशन करून) किंवा इंटरनेट बँकिंग ॲक्टिवेशन करून किमान रुपये 100/-चा पहिला व्यवहार केल्यास त्यालाही 100 रूपयांचा रोख परतावा ग्राहकाच्या खात्यामध्ये जमा होईल. या योजनेचा 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या धर्तीवर पहिल्या पाच लाख ग्राहकांनाच याचा लाभ घेता येईल. बँक ऑफ महाराष्ट्राच्या ज्या ग्राहकांनी अद्याप डेबिट कार्ड घेतले नसेल किंवा इंटरनेट बँकिंग आणि मोबाइल बँकिंगद्वारे आर्थिक व्यवहार करण्यासाठीइच्छुक असतील त्यांच्यासाठी रोख परतावा मिळवण्याची ही एक चांगली संधी आहे.